लघु-उद्योग प्रशिक्षणाच्या संधी

प्रा. दीपक ताटपुजे

आपल्या देशातील बेरोजगारीची समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी युवकांना उद्योग-प्रवण करणे आवश्यक आहे. तसेच नवउद्योजक आणि सद्यउद्योजकांना विकासासाठी आवश्यक असणारी माहिती, वित्तीय संस्थांची कार्यपध्दती, बाजारपेठेतील बदल आणि त्यांचे विश्लेषण, परदेशी बाजारपेठेची सद्यस्थिती आणि त्यामधील नवीन प्रवाह आदींची माहिती देणाऱ्या लेखमालेतील हा पहिला लेख.....

आपल्या देशाची वाढणारी लोकसंख्या आणि त्यामुळे सातत्याने युवकांची बेरोजगारीची समस्या अधिकाधिक तीव्र बनू लागली आहे. यातूनच मोठ्या शहरांकडे युवकांचा वाहणारा लोंढा अनेक समस्या निर्माण करू लागला आहे. यामुळेच प्रत्येक परिसरातील स्थानिक गरजांचे तसेच बाजारपेठेचे सर्वेक्षण करून उद्योगांचे विकेंद्रीकरण होणे ही आपल्या देशाच्या आर्थिक विकासाची प्रमुख गरज बनली आहे.

कोणत्याही मोठ्या उद्योगाची निर्मिती ही लघु-उद्योगांमधुनच होत असते. यामुळे लघु-उद्योगांची वाटचाल यशस्वीपणे होणे आवश्यक आहे. या उद्योगांच्या प्रारंभीच्या काळात उद्योजकास अनेक अडचणी, तीव्र स्पर्धा यांना सामोरे जावे लागते. यासाठीच अशा काळात शासकीय योजनांची मदत ही उद्योग समक्ष बनवण्यासाठी साह्यभुत ठरत असल्याने, विविध योजना ह्या उद्योग-विकासाच्या प्रक्रियेचा अत्यावश्यक भाग बनल्या आहेत. प्रस्तुत लेखात अशाच योजना, संधींची माहिती देत आहोत.

बाजारपेठ सर्वेक्षणानुसार एक उद्योग उभा राहिल्याने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षिरित्या ८ ते १० व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो. तसेच अशाप्रकारच्या लघुउद्योगांमुळे देशाच्या आर्थिक विकासामध्ये मोलाची भर पडते यामुळेच लघुउद्योगांना शासनाने अनेक सवलती देऊन उद्योगांना प्रोत्साहन दिले आहे. आबिद हुसेन समितीच्या शिफारशींनुसार लघु-उद्योगाच्या व्याख्येमध्येच बदल करून, यंत्रसामुग्रीमधील गुंतवणुकीची साठ लाखांची मर्यादा तीन कोटींपर्यंत केली आहे. तसेच लघुत्तम उद्योगाची मर्यादा पाच लाखावरून पंचवीस लाखापर्यंत केली आहे. यामुळे लघु-उद्योजकांना व्यवसाय वाढीसाठी मोठा हातभार लागणार आहे. विविध उद्योग तसेच प्रक्रिया उद्योंगांकरीता साह्यभुत उद्योगांकडून (ॲन्सिलरी इंडस्ट्रिज) आवश्यक तो कच्चा - माल उपलब्ध होण्यासाठी तसेच उद्योग विकेंद्रीकरणासाठी ग्रामीण भागामध्ये लघुत्तम उद्योग (टायनी इंडस्ट्री) तसेच अति लघुत्तम उद्योग (मायक्रो इंटरप्रायजेस) यांची वाढ आणि विकास होणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्प राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये युवक लाभार्थींसाठी राबवला जातो. या कार्यक्रमाअंतर्गत व्यवसाय उभारणी , प्रशिक्षण, बाजारपेठ निवड तसेच अनुदानासह पतपुरवठा, उद्योग वाढीसाठी करण्यात येतो. तसेच ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील युवकांसाठी 'ट्रायसेम' (ट्रेनिंग टू रूरल युथ फॉर सेल्फ एम्प्लॉयमेंट) ही योजना स्वयंरोजगारासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या 'जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या कार्यालयाच्या अंतर्गत राबवण्यात येते. या कार्यक्रमांर्तगत विविध उद्योगांचे सहा महिने मुदतीपर्यंत प्रशिक्षण देण्यात येते. या काळात विद्यावेतन तसेच उद्योग उभारणीसाठी अनुदानासह पतपुरवठा करण्यात येतो.

ग्रामीण भागातील महिलांचे बचत गट स्थापन करून या गटांना प्रशिक्षण, अर्थसहाय्य आणि अनुदान देऊन व्यवसाय निर्मितीसाठी याच यंत्रणेमार्फत ''डवाक्रा'' (DWCRA) डेव्हलपमेंट ऑफ वूमन ॲन्ड चाइल्ड इन रूरल एरिया ही योजना राबवण्यात येते. शहरी विभागातील दारिद्र रेषेखालील नागरिकांसाठी ''पंतप्रधान एकात्मिक नागरी दारिद्र - निर्मूलन कार्यक्रम'' नगरपालिकांमार्फत राबवण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत स्वयंरोजगार कर्जपुरवठा, स्वयंरोजगार प्रशिक्षण देण्यात येते. लघु-उद्योग विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली ''लघु-उद्योग व्यवस्थापन सहाय्यक प्रशिक्षण'' या योजनेअंतर्गत ही तीन महिने मुदतीचे विशेष प्रशिक्षण निवडक जिल्ह्यांच्या ठिकाणी देण्यात येते.

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने स्थानिक स्तरावर तंत्रज्ञांची निर्मिती होऊन स्वयंरोजगार निर्माण व्हावेत या दृष्टीने ''स्कील डेव्हलपड् ट्रेनिंग थ्रू सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी'' ही योजना तसेच उद्योजकता विकास कार्यक्रम आखलेले असून हे कार्यक्रम आपल्या राज्यात प्रत्येक जिल्ह्याच्या उद्योग केंद्रांमार्फत मिटकॉन लि. आणि उद्योजकता विकास केंद्र यांचेव्दारे चालवले जातात. उद्योग संचलनयाअंतर्गत प्रत्येक जिल्हा उद्योग केंद्रांमधुन पंतप्रधान रोजगार योजना, बीज भांडवल योजना अंतर्गत विविध उद्योगांसाठी कर्जपुरवठा तसेच प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षण काळात लाभार्थींनाा विद्या-वेतन ही देण्यात येते. महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा अंतर्गत ग्रामीण भागांमधुन अतिलघुत्तम उद्योग उभे राहून स्वयंरोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण आणि वित्तसहाय्य राज्यातील निवड केलेल्या जिल्ह्यांमधुन देऊन ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी देण्यात येते.

या कार्यक्रमांबरोबरच शासनाच्या अंगिकृत असणाऱ्या उपक्रमांपैकी महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक विकास महामंडळ, आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आदी महामंडळांमधुन विशिष्ठ जाती-जमातींच्या लाभार्थींसाठी स्वयंरोजगाराविषयक प्रशिक्षण तसेच पतपुरवठा त्यांच्या प्रत्येक जिल्हा कार्यालयांकडून करण्यात येतो.

आपल्या महाराष्ट्रराज्यात एकूण उभारलेल्या उद्योगांपैकी यशस्वी उद्योगांचे प्रमाण फारच कमी आहे. तसेच उद्योग उभारणीचा वेग ही बाजारपेठेच्या तुलनेत मर्यादीत आहे. यामुळेच शासनाच्या रिझर्व बँकेने केलेल्या तरतुदी उद्योग - विकासाच्या दृष्टीने अतिशय तुटपुंज्या असल्याने या क्षेत्राच्या विकासाकडे अधिक गांभीर्यपूर्वक पाहणे गरजेचे आहे. तसेच केवळ उद्योग - संधींचा फायदा घेणे ही प्रक्रिया सुध्दा बेरोजगारी कमी करण्यासाठी उपयुक्त नसुन या लाभार्थींनी यशस्वी उद्योगासाठी जिद्दीने व्यवसाय करून उद्योग - उभारणी समर्थपणे चालवण्याची सामाजिक मानसिकता तयार होणे अत्यंत आवश्यक आहे.

लघु - उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक मनुष्यबळ निर्मिती तसेच या उद्योगांमधुन विविध कार्यकल्पांसाठी प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करणे या प्रमुख दोन उद्दिष्टांसाठी वरील उल्लेखित कार्यक्रम तसेच उद्योग विषयक प्रशिक्षणांच्या संधींची उपलब्धता, पत पुरवठा, अनुदान आदींची माहिती युवकांना होणे उद्योग समक्ष होण्यसाठी आवश्यक आहे.